**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# पाटण महोत्सवात सहभागी व्हावे: याज्ञसेन पाटणकर

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

पाटण महोत्सवाचा मुख्य उद्देश शेती-उद्योग-नवउर्जा-स्वयंरोजगार या सर्व घटकांना एकत्र जोडून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे आहे. या माध्यमातून शेतकरी, छोटे-मोठे व्यवसायिक, उद्योजक, बचतगट आणि सर्वसामान्य नागरिकांना स्वतंत्र व्यासपीठ मिळणार आहे. महोत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

पाटणमध्ये कोयना एज्युकेशन सोसायटी पाटण, बा. दे. कॉलेज पाटण आणि रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ फेब्रुवारी ते दि. २ मार्च या कालावधीत पाटण महोत्सवाचे आयोजन केले आहे. याबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्र. प्राचार्य तथा संयोजन समितीचे चेअरमन डॉ. विलासराव कळंत्रे, समन्वयक डॉ. हेमलता काटे, सचिव विजय काटे, सदस्य डॉ. दीपक पाटील, डॉ. विनायक राउत, डॉ. संतोष पाटील, शिवहर आंबेगावे, अनिल पाटील, विनायक माथने , सतीश गायकवाड, डॉ. प्रशांत फडणीस उपस्थित होते.

याज्ञसेन पाटणकर म्हणाले, यातून स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. महोत्सवात येण्यासाठी कोणतेही चार्जेस नाहीत. २० टक्के गाळे बचत गटांसाठी, विद्यार्थ्यांसाठी मोफत दिले आहेत. महाविद्यालयाच्या यंत्रणेमार्फत सर्व चोख नियोजन केले आहे.